# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

सत्यमेव जयते

barti

२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०

● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

## प्रेस नोट

**दि. १७/०४/२०१७**

**कृपया प्रसिद्धीसाठी**

**'बार्टीमध्ये' भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती निमित्ताने "नॉलेज डे" (ज्ञान दिवस) साजरा**
**समता सप्ताह निमित्ताने बार्टीच्या नविन संकेतस्थळाचे उदघाटन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे आयोजित सामाजिक समता सप्ताह विविध कार्यक्रमाच्या माध्यमाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी अतिरिक्त महासंचालक, मा. प्रभावती आकाशी होत्या तसेच विशेष अतिथी प्रभारी जिल्हाधिकारी, पुणे मा. श्री. रमेश काळे, संचालक, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग मा. डॉ. ओ.ए. बेडेकर तसेच प्रादेशिक पासपोर्ट अधिकारी,पुणे मा. श्री अतुल गोतसुर्वे , सहाआयुक्त, आयकर विभाग, पुणे मा. श्री. अजय डोके, तसेच बार्टीचे महासंचालक मा. श्री. राजेश ढाबरे व बार्टीच्या निबंधक, रुपाली आवले इ. मान्यवर उपस्थित होते.




"नॉलेज डे" निमित्ताने विविध वैशिष्टयपुर्ण कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते बार्टीच्या नविन संकेतस्थळाचे उदघाटन, पुरोगामी साहित्यावरील पुस्तक प्रदर्शन व विक्री , अंधश्रध्दा निर्मूलनाविषयी जनजागृती, ७ ते १४ वयोगटातील मुलांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध वेशभुषेतील मौलिक संदेश सादरीकरण, ससुन सर्वसाधारण रुग्णालय विभाग यांच्या

वतीने अवयव दान या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले. तसेच बार्टी च्या येरवडा येथील महीला गटाने व्यसन मुक्ती या विषयावर पथनाट्य सादर केले. येरवडा येथील दुसऱ्या गटाने शेतकऱ्या ची व्यथा हे पथनाट्य सादर केले असे विविध सामाजिक विषयांवर पथनाटय सादरीकरण करण्यात आले तसेच येथील महिला बचत गटांचे उत्पादित वस्तू व खादयपदार्थ स्टॉल, व्याख्यान- डॉ. बाबासाहेब आंबेडकर: एक प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दुर्मिळ फोटो प्रदर्शन,शाहीर देवानंद माळी यांची प्रबोधनपर शाहिरी, ताण- तणाव व्यवस्थापन- चर्चासत्र,मोफत- आरोग्य शिबीर, ग्रंथालयाचे उदघाटन तसेच जेष्ठ साहित्यिक व अभ्यासक डॉ. रावसाहेब कसबे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक अष्टपैलू व्यक्तिमत्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बार्टीच्या अधिकारी चित्रगंधा मुन यांनी केले. 'बार्टीचे' अहवाल वाचन प्रकल्प संचालक, श्री. नितीन सहारे यांनी केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बार्टी चे सर्व विभागातील प्रकल्प संचालक, अधिकारी व कर्मचारी यांनी योगदान दिले व कार्यक्रम यशस्वी केला.

**प्रसिध्दि विभाग**